# राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोग अधिनियम, २००४

## (सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५)

## अनुक्रमणिका


**उद्देशिका**

प्रकरण एक

**प्रारंभिक**

**कलमे**

१. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

२. व्याख्या.

प्रकरण दोन

**आयोग–रचना, उद्दिष्टे, कार्ये, कामकाज, कर्मचारीवर्ग, स्थान व व्यवस्थापन**

३. आयोग स्थापन करणे.

४. आयोगाची रचना.

५. अध्यक्ष व सदस्य यांचा पदावधी आणि नियुक्तीच्या शर्ती.

६. आयोगाची ध्येये व उद्दिष्टे.

७. आयोगाची कामे व व्याप्ती.

८. आयोगाच्या कामकाजाची रीत किंवा कार्यपद्धती.

९. विद्यमान संस्थांमधील मनुष्यबळासह सुविधांचा वापर करणे.

१०. प्रकल्पाला निधी पुरविणे.

११. आयोगाची बैठक.

१२. आयोगाचे अधिकारी आणि इतर कर्मचारी.

१३. अवेक्षण परिषद.

प्रकरण तीन

**निधी, अर्थसंकल्प, लेखे, लेखापरीक्षा व विवरणे**

१४. राज्य शासनाचे अनुदान.

१५. आयोगाचा निधी.

१६. आयोगाला अनुदान, देणग्या, इत्यादी देणे.

१७. अर्थसंकल्प.

(ञ) विज्ञान व तंत्रज्ञानातील नवनवीन पद्धतींचा अंतिमतः प्रत्यक्ष वापर करणाऱ्यांनी घेतलेल्या पुढाकारास पाठिंबा आणि प्रोत्साहन देणे ;

(ट) परस्पर संबंधित प्रकल्पांसाठी समान कार्य प्रचालन विभागांकरिता निधी उभारणे व त्याचा वापर करणे ;

(ठ) प्रकल्प, कार्यक्रम व वित्त पुरवठा यांसाठी देशाबाहेरील संस्था आणि द्विपार्श्विक अभिकरणे व आंतरराष्ट्रीय विकास अभिकरणे यांच्यात परस्परसंबंध प्रस्थापित करणे.

**विद्यमान संस्थांमधील मनुष्यबळासह सुविधांचा वापर करणे.**

**९.** (१) आयोगास, त्याची कार्ये पार पाडताना, कोणत्याही विद्यमान खाजगी किंवा शासकीय शैक्षणिक आणि संशोधन व विकास संघटनांमध्ये उपलब्ध असतील अशा सुविधांचा वापर करता येईल आणि याबाबत केलेल्या विनियमांना अधीन राहून, आयोग, अशा संस्थांना, त्या आयोगाला पुरवित असलेल्या सुविधा किंवा आयोगाच्या वतीने हाती घेण्यात येणारे काम, यांच्या बदल्यात आर्थिक पाठबळ पुरविण्याची व्यवस्था करील.

(२) या संस्थांमध्ये काम करणाऱ्या व्यक्तींनी आयोगाच्या वतीने हाती घेण्यात आलेल्या प्रकल्पांमध्ये आपला वेळ दिला असल्यास किंवा तसा वेळ त्या देत असल्यास, असा वेळ देणाऱ्या व्यक्तींचे वेतन व इतर भत्ते यांची प्रतिपूर्ती, आयोगाकडून, विनियमांनुसार अशा संस्थांकडे केली जाईल.

**प्रकल्पाला निधी पुरविणे.**

**१०.** (१) आयोगास, तंत्रज्ञानाच्या विकासाकरिता, प्रकल्प तयार करण्याकरिता, प्रकल्पाच्या प्रात्यक्षिकाकरिता, प्रकल्पांची अंमलबजावणी करण्याकरिता किंवा आयोगाची अन्य कोणतीही कार्ये करण्याकरिता निवड करण्यात आलेल्या संस्थांना योग्य ते आर्थिक पाठबळ देता येईल.

(२) आयोग, संस्था निश्चित करण्याकरिता आणि अशा संस्थांना, पोट-कलम (१) अन्वये आर्थिक पाठबळ देण्याकरिता, विनियम तयार करील.

**आयोगाची बैठक.**

**११.** आयोग आवश्यक असेल तेव्हा आणि त्यावेळी बैठक घेईल आणि, विनियमांद्वारे तरतूद करण्यात येईल अशी आपल्या बैठकीचे कामकाज चालविण्यासंबंधातील कार्यपद्धती अनुसरील.

**आयोगाचे अधिकारी आणि इतर कर्मचारी.**

**१२.** (१) आयोगास, या अधिनियमाखालील त्याची कार्ये कार्यक्षमतेने पार पाडण्याकरिता, त्याच्या मते आवश्यक असेल अशा तंत्रविषयक किंवा प्रकल्पविषयक कर्मचारीवर्गासह अन्य अधिकारी व कर्मचारी यांची नियुक्ती करता येईल किंवा त्यांना प्रतिनियुक्तीवर घेता येईल. आयोगाच्या अशा अधिकाऱ्यांचे व अन्य कर्मचाऱ्यांचे दोन प्रवर्ग असतील :—

(क) **स्थायी कर्मचारीवर्ग.**— यामध्ये, आयोगाचे दैनंदिन काम कायम तत्त्वावर करण्यासाठी आवश्यक असलेल्या प्रशासकीय आणि सचिवालयीन अधिकाऱ्यांचा आणि कर्मचारीवर्गाचा समावेश होतो ;

(ख) **तात्पुरता किंवा प्रकल्पाचा कर्मचारीवर्ग किंवा आनुषंगिक, कंत्राटी किंवा नियत अवधीसाठी नियुक्त करण्यात आलेला कर्मचारीवर्ग.**— यामध्ये, आनुषंगिक नियुक्तीद्वारे किंवा विनिर्दिष्ट प्रकल्पासाठी कंत्राटी तत्त्वावर किंवा विनिर्दिष्ट कालावधीसाठी नियत अवधी तत्त्वावर, तात्पुरती नियुक्ती केलेल्या व्यक्तींचा समावेश होतो.

